हे वागणे म्हणजे त्याच्या व्यक्तित्वाचा खराखुरा अविष्कार नसतो म्हणून नाटककाराने या व्याज-कृतींच्या आविष्कारात न फसता, नाटकातील पात्रांचा स्वभाव जाणून त्यानुसार घडणाऱ्या कृती कोणत्या यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे इतकेच नव्हे तर या कृती स्वाभाविक आहेत हे नाटकात दर्शविण्यात तो यशस्वी झाला पाहिजे. इथे लेखक जीवनातील वास्तव आणि कलेतील वास्तव, जीवनातील सत्य आणि कलेतील सत्य यासंबंधीचा विचार सूचित करीत आहेत. ज्या काळात हा लेख लिहिला गेला त्याच्या तुलनेने हा खूप पुढे गेलेला विचार आहे.

मराठीत गो. ग. आगरकर यांनी आपल्या 'कवी, काव्य, काव्यरति' या लेखात प्रथम मनुष्याच्या मनोधर्माचा विचार मांडला. तो श्री. बापट यांना उपलब्ध होताच काव्य म्हणजे अंतर्बाह्य सृष्टीतील वस्तूंचा यर्थार्थ निर्णयच आहे असे आगरकर म्हणतात. मराठी साहित्यसमीक्षेत माणसाच्या अंत:सृष्टीचे स्थान प्रथम आगरकरांनी जाणले. जागृतावस्थेत मन चंचल असता त्यात जे व्यापार चालतात त्यांचे 'संवेदना', 'इच्छा' व 'ज्ञान' असे तीन वर्ग करुन या तीन अनुभवास 'मन' ही संज्ञा आहे हे आगरकरांनी सांगितले आणि कवीची करामत हुबेहुब चित्र काढण्यात आहे. मूळ उत्पन्न करण्यात नाही हा महत्वाचा विचार मांडला. मानसशास्त्रीय समीक्षेचा तसाच कलानिर्मितीप्रक्रियेचा शोध घेण्याचा हा आरंभबिंदू आहे. आगरकरांपासून मराठी साहित्यसमीक्षा नवे रूप धारण करु लागली. त्यापूर्वीची, रसविचार केंद्रस्थानी असलेली, संस्कृताश्रयी, पारंपारिक समीक्षा काही प्रमाणात दूर गेली. नाटकाची बांधणी आणि व्यक्तिदर्शन याकडे आपल्या समीक्षकांचे लक्ष जाऊ लागले. श्री. बापट यांनी समीक्षेचा हा नवा दृष्टिकोन स्वीकारला आणि 'शाकुंतल' चे सौंदर्य त्याच्या संविधानकाच्या बांधणीत आणि व्यक्तिदर्शनात, मनोदर्शनात आहे हे सत्य त्यांनी प्रथमच पध्दतशीरपणे प्रस्थापित केले.

नाटकातील घटकावयवाचा (Situation) मांडलेला विचार फार महत्वाचा आहे. मोठे व लहान घटकावयव एकत्र गुंफून संविधानक कसे बनते ते दाखविण्याचा इतका प्रभावी प्रयत्न मराठीत या लेखापूर्वी झाला नव्हता. पौर्वात्य समीक्षेतील संविधानकाची कल्पना आणि पाश्चात्यांची (Situation) ची नेमकी कल्पना या संबंधीच्या चिंतनातून 'शाकुंतल' त्यांनी वाचकांपुढे उलगडत नेले आहे. कलावंत हा कोणत्या अर्थाने 'निर्माता' असतो, त्याचे कार्य काय असते याबाबतचे विचार मौलिक आहेत. कलावंत म्हणजे प्रतिविश्वकर्मा असतो. नाटककार, चित्रकार, शिल्पकार, चितारी, जीवसृष्टीचे नियम पाळून सृष्टीचे अनुकरण

करतात. दोन्हीतील साम्य शोधतात त्याचप्रमाणे कल्पनातीत गोष्टींपासूनही मनोरंजकत्व निर्माण करतात हे सांगत असताना श्री. बापट कलावंताच्या निर्मितीव्यापाराबद्दल लिहीत आहेत असे लक्षात येते. सृष्टिजन्य वस्तूंचे तसेच कृत्रिम निर्जिव वस्तूंचे अनुकरण सर्व कलावंत करीत असतात. या वस्तूंची मनोरंजकता (म्हणजे सौंदर्यक्षमता) त्यातील रेषा, रंग, आकार, छाया, प्रकाश, यातील समप्रमाणतेवर अवलंबून असते हे सत्य सांगून ते थांबतात. निर्जीव वस्तूंच्या अनुकरणातून सजीव कलाकृती निर्माण करताना कलावंतांच्या व्यक्तिमत्वाचे रंग त्यात मिसळत असल्यामुळे ती अ-पूर्व ठरते हा विचार कालिदासाच्या संदर्भात स्पष्ट केला गेला असता तर समीक्षेतील महत्वाच्या घटकाचा विचार मांडला गेला असता. कलावंताचे त्याच्या प्रतिभाशक्तीशी नवनिर्माणक्षमतेशी असलेले नाते, कलाकृतीत येणारा त्याचा प्रत्यय शाकुंतलमधील उदाहरणांमधून उलगडत नेले असते तर श्री. बापट कलाकृतींचा घाट, त्यातील लय या आधुनिक संकल्पनांच्या थोडे जवळ जाऊन पोचले असते. या संकल्पनांची निसटती जाणीव या विवेचनात दिसते ही गोष्टही फार महत्वाची आहे.

महाभारतातील मूळ आख्यानात कालिदासाला जी वैशिष्ट्यपूर्णता दिसली, ती, तो कालिदास होता म्हणून दिसली. त्याने नाटकाची 'इमारत' रचली आणि त्यात प्राणही ओतला. यामागे कलावंत म्हणून त्याचे काही मनोव्यापार होते, व्यक्तित्व होते हे अधिक स्पष्ट करता आले असते.

या संदर्भात पुन: प्रा. दि. के. बेडेकर यांनी व्यक्त केलेले विचार महत्वाचे आहेत. प्रा. बेडेकर यांनी कलाकृतीच्या रसग्रहणाच्या दृष्टीने असा प्रश्न उपस्थित केला आहे की, कलाकृतीच्या जन्मकालानंतर युगांतराने त्या कृतीचे रसग्रहण करण्याचा प्रसंग जेव्हा रसिकांवर येतो तेव्हा काय होते ? प्रा. बेडेकर म्हणतात, हा प्रश्न शाकुंतलाच्या बाबतीतच नेहमी येतो कारण आजच्या रसिकाला त्या काव्याचे सौंदर्य सहज अनुभविता येते आणि मग त्याला प्रश्न पडतो की, हे सौंदर्य देशकालनिरपेक्ष म्हणावे की काय ? प्रा. बेडेकर देशकालनिरपेक्ष सौंदर्याचे तत्व मानण्याऐवजी शाकुंतलाचा विचार वेगळ्या तऱ्हेने मांडतात. ते म्हणतात, प्रथम गुप्तकालीन समाज - वास्तव व कालिदासाचे व्यक्तित्व यांचा विचार आपण केला पाहिजे. त्या वास्तवामध्ये एकंदर हिंदू समाजाला प्रेरक व त्याची धारणा करणाऱ्या कर्म सिध्दांताचा विचार साहजिकच प्रथम मनात येतो व मनुष्याचे सुखदु:ख कर्मामुळे कसे त्याला भोगावे लागते हे त्या काव्यात आपण पाहू लागतो. मुद्रिका-

विस्मरणाच्या प्रसंगाचा अर्थ मग सहज कळू शकतो. विस्मरणामुळे शकुंतलेला विनाकारण भोगावे लागलेले दारुण दु:ख आपल्याला मग कळू शकते. अर्थात ह्या सर्व वास्तवाचे नुसते वर्णन करण्याचे काम कालिदासाने केलेले नाही. त्याच्या व्यक्तित्वात या वास्तवाचा एकप्रकारे पुनर्जन्म झाल्यावर त्या वास्तवाने कवीच्या व्यक्तित्वाचा रंग घेतल्यावर आपल्यापुढे ते वास्तव काव्याच्या अभिनव स्वरुपात उभे आहे. धीरोदात्त नायकाने व नायिकेने कर्माला तोंड देताना जे वर्तन केले त्या वर्तनाचा आदर्श कालिदासाने रसिकांपुढे ठेवला आहे. गुप्तकालीन नागर संस्कृतीमध्ये बुध्दप्रणित व गीताप्रणित मानवधर्मांचा व सर्वभूतहितवादाचा आदर्श प्रभावी होता. शाकुंतलामध्ये तोच आदर्श कलात्मक रीतीने मांडला गेला आहे. शाकुंतलाच्याद्वारे आपल्याला कालिदासाच्या व्यक्तित्वाचेही दर्शन घडते ते असे समकालीन संस्कृतीमध्ये जो उच्च, मानवहितवादी आदर्श होता त्या आदर्शाला आत्मसात करणारा असा तो कलावंत होता. असे जरी होते तरी समकालीन संस्कृतीचाच आशय त्याच्या काव्यात आहे हे मात्र दृष्टिआड करता येणार नाही. उदाहरणार्थ - आदर्श स्त्रीसंबंधीच्या त्याच्या कल्पना मध्ययुगीनच आहेत व लतेची उपमा तो स्त्रीला देतो. ती त्या कल्पनेला अनुसरुनच देतो.

आधुनिक रसिकाला शाकुंतलाचे सौंदर्य हृद्य वाटते. ते त्या काव्यातील वास्तवाचा आणि कालिदासाच्या व्यक्तित्वाचा संगम पाहूनच वाटते. आधुनिक रसिकाने जर आजच्या स्त्रीविषयक कल्पना व राजे लोकांबद्दलच्या कल्पना मनात वागवून शाकुंतलाचे रसग्रहण करावयाचा प्रयत्न केला तर त्याला शाकुंतलाशी समरसच होता येणार नाही. त्याने आपल्या युगसंस्कृतीला क्षणभर विसरुन कालिदासकालीन युगाच्या वास्तवाशी तन्मय झाले पाहिजे व कालिदासाच्या व्यक्तित्वाशी एकरुप झाले पाहिजे. ज्या प्रमाणात रसिकाला हे करता येईल त्या प्रमाणातच रसग्रहणही निर्दोष व पूर्ण होईल.

कलावंताच्या व्यक्तित्वात समकालीन युगधर्म मुरलेला असतोच. तो तसा मुरलेला हवाच. ते त्याचे सामर्थ्यही असते आणि मर्यादाही असते हा विचार येथे प्रा. बेडेकरांनी व्यक्त केलेला आहे. कलाकृती ज्या काळातील असेल तो काळ मनाने अनुभवून, त्याच्याशी समरस होऊनच तिचे रसग्रहण करता येईल हे विवेचन महत्वपूर्ण आहे.

नाटकातील अद्‌भुतरसाची मीमांसा करताना श्री. बापट यांनी त्यातील महत्वाचे तत्व अचूक सांगितले आहे. नाटकाला गती देणारा एक घटक म्हणून अद्‌भुततेकडे पाहावे,

अद्‌भुताच्या प्रभावाखाली माणसे कशी वागतात त्याच्या हातून कोणत्या कृती घडतात ते पाहावे. त्या कृतींमध्ये नाट्य असते हा मौलिक विचार त्यांनी मांडला आहे. नाटकातील अद्‌भुतता, अगदी कालिदासाने ती आणली असली तरी, त्यावर आक्षेप घेतला जाईल म्हणून श्री. बापट यांनी शेक्सपीअरचे उदाहरण दिले आहे. शेक्सपीअरच्या नाटकांमध्ये अद्‌भुतता दिसते. तोही एक कालिदासाप्रमाणेच थोर कलावंत होता. मानवी मनाचे दर्शन घडविताना अमानवी घटकांचा वापर आक्षेपार्ह नाही असेच श्री. बापट सुचवीत आहेत. 'शाकुंतल' सारख्या नाटकातील अद्‌भुतता आणि 'फार्स' मध्ये वापरली जाणारी अद्‌भुतता, अमानवी पातळी यातल्या फरकांचे भान मात्र येथे व्यक्त केलेले नाही. महाभारताचा काळ आणि कालिदास नाटक लिहीत होता तो काळ यातील अंतर त्याने लक्षात घेतले आहे असे श्री. बापट म्हणतात. आकाशवाणी ही या युगात असंभाव्य घटना आहे हे कालिदासाने जाणले असे ते म्हणतात. पण 'शाकुंतल' मध्ये अंतर्ज्ञान, शाप, उ:शाप, मेनकेने शकुंतलेला स्वर्गात उचलून नेणे, ताईताचा सर्प होण्याची कल्पना अशा कालिदासकाळातही अद्‌भुत कोटीत जमा होणाऱ्या घटना आहेतच. मग कालिदासाने काळाचे भान ठेवले हे म्हणणे कसे संयुक्तिक ठरेल ? अद्‌भुताच्या वापराची केलेली मीमांसा हे लेखकाचे खरे श्रेय आहे. कालिदास अद्‌भुताचा वापर उथळ मनोरंजनासाठी करीत नसून शाकुंतलातील अद्‌भुत घटनांमुळे घटनाप्रसंगांची एक सुरेख साखळी निर्माण होते. नाटकाला गती येते. मनोरम असे भावदर्शन घडते म्हणून 'शाकुंतल' मधील अद्‌भुतरसाचा आविष्कार आस्वाद्य ठरतो. संस्कृत रसव्यवस्थेत अद्‌भुताला स्थान दिले आहे. ते मानवी मनोधर्माशी त्याचे काही नाते आहे म्हणूनच. या नात्याकडे श्री. बापट कसे पाहतात याचा विचार करण्यासारखा आहे. अद्‌भुत रसाचा स्थायीभाव विस्मय आहे हे सांगून त्यांनी 'शाकुंतल' मधील एक उदाहरण दिले आहे. राजा शकुंतलेला विसरेल का असे अनसूयेला वाटणे व पुढे तसेच घडून येणे यामुळे विस्मय उत्पन्न होतो म्हणून या तिच्या वाटण्याचा संबंध त्यांनी अद्‌भुताशी जोडला आहे. परंतु ते पटत नाही. अनसूयेच्या मनात राजाविषयी असा विचार आला याचे कारण 'अतिस्नेह: पापशंकी' हे आहे. तिचे आपल्या सखीवर नितांत प्रेम होते म्हणूनच तिची सर्वतोपरी काळजी तिला वाटत होती. शकुंतलेपेक्षा अनसूया अधिक व्यवहारदक्ष आणि परिस्थितीचा विचार करु शकणारी होती. शकुंतलेची विचारशक्ती मदनबाधेमुळे लोप पावली होती पण अनसूया स-जग होती. शकुंतलेची कामविव्हल स्थिती माहीत असल्यामुळे तिची जबाबदारी आपल्यावर आहे अशी तिची भावना होती. राजे, राजपुरुष यांची मधुकर वृत्ती, त्यांचे बहुपत्नीकत्व हे अनसूयेला ऐकून का होईना ठाऊक होते. अनसूयेचे कालिदासाने चित्रित केलेले व्यक्तिमत्व शालीन पण प्रौढ, गंभीर, विचारी

असे आहे या तिच्या स्वभावानुसार आणि शकुंतलेवरील उत्कट प्रेमामुळे तिच्या मनात राजाविषयी शंका येते. यामध्ये राजाला तसे काही घडले नसताना दूषण देण्याची बुध्दी नसून जर दुर्दैवाने तसे घडले तर शकुंतलेच्या कोमल, निष्कपट अंत:करणाची काय अवस्था होईल हा विचार प्रबळ आहे. शकुंतलेच्या तशा अवस्थेची कल्पनासुध्दा अनसूयेला असह्य आहे त्यामुळे अनूसयेला असे वाटण्यात अद्‌भुत, विस्मयकारक काही नाही. अनसूयेचे वाटणे अद्‌भुत मानायचे असेल तर 'भावस्थिराणि जननान्तरसौहृदानि' सुध्दा अद्‌भुतच म्हणावे लागेल. कण्वांचे शकुंतलेवरील उत्कट प्रेमही अद्‌भुत मानावे लागेल. या मनोवस्था, त्यातील उत्कटता, त्यानुसार व्यवहारातील घटनांविषयी तर्क करणे, यांचा संबंध तरल, उत्कट संवेदनांशी असतो. वाटेलत्या व्यक्तीच्या बाबतीत हे घडणार नाही. अनसूयेची शंका खरी ठरणे नाट्यदृष्ट्या आवश्यक आहे आणि दुष्यंताचे शकुंतलेवरील प्रेम अस्सल आहे हेही दाखवावयचे आहे म्हणून कालिदासाला दुर्वासाच्या शापाचा अद्‌भुत प्रसंग घालावा लागला. राजाच्या विस्मृतीचे मूळ कारण असणारा शाप हा अद्‌भुत. अनसूयेची शंका अद्‌भुत किंवा विस्मयकारक नाही.

Unity of Action नाटकातील कृती आणि कृतिसमुच्चय म्हणजे काय, या संबंधीचे विवेचन अतिशय मूलगामी स्वरुपाचे आहे. दु:ख सोसणे ही सुध्दा एक कृतीच आहे हे जेव्हा श्री. बापट स्पष्ट करतात तेव्हा ते एक आधुनिक काळातला विचार मांडीत आहेत हे जाणवते. नाट्यलेखनातील काही मोकळ्या जागा, रंगमंचावरील मूकता, स्तब्धता यांचे नाट्यदृष्ट्या आज आपण किती महत्व मानतो ते सुपरिचित आहे. Unity of Time, झश्ररलश रवि Action. ही संकल्पना मुळात पाश्चात्य नाट्यसमीक्षेची. या समीक्षेचा आणि शेक्सपीअरचा प्रभाव हा तत्कालीन विद्वानांवर खूपच असलेला दिसतो. भारतीय नाट्यपरंपरा ही शेक्सपीअरच्या खूप आधीची. जी तत्वे पुढच्या काळात परिचित झाली, महत्वाची ठरली ती आपल्याकडील नाटकात कोठे व कशी दिसतात या दिशेने विचार करुन भारतीय नाटक किती प्रगल्भ होते ते मांडणे, ही 'रंगभूमी' कालीन वैशिष्ट्यपूर्ण घटना होती. संविधानकातील कृतींचे विविध प्रकार, त्यांचे परस्परसंबंध, परस्पर परिणाम आणि त्यामुळे नाटकाला मिळणारी गती यासंबंधीचे इतके सूक्ष्म विवेचन या लेखापूर्वी मराठीत कोठेही आलेले नव्हते.

पाश्चात्य तत्वे डोळसपणे अभ्यासून आपल्या कलाकृतींच्या संदर्भात विवेचन करणे हा मराठी साहित्यसमीक्षेतला एक महत्वपूर्ण टप्पा इथे दिसतो. कृतीतील खिंडी म्हणजे काय,

त्या बुजविणे म्हणजे काय याचा पध्दतशीरपणे केलेला विचार हा श्री. बापट यांच्या नाट्यरचनाशास्त्रातील जाणकारीचा निदर्शक आहे.

'शाकुंतल' च्या मध्याचा विचार करताना नाटकाला दिलेली कमानीची उपमा विवेचनाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. पाचवा अंक हा या नाटकाचा मध्य आहे असे सांगताना त्यांनी जो एक आक्षेप किंवा उणीव नोंदवलेली आहे तिला वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या संदर्भात महत्व आहे. त्यांच्या मते दुर्वासाचा शाप काय आहे हे चवथ्या अंकात कळायला नको होते. पाचव्या अंकातील दुष्यंताच्या मन:क्षोभाचा परिणाम त्यामुळे उणावतो. 'शाकुंतल नाटक-निबंधामध्येङ्क' संविधानकासंबंधी लिहिताना तो विचार दोन अंगांनी करावा लागतो हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. कथानक पुढे सरकत असताना मनावर होणारा परिणाम, म्हणजे वाचक-प्रेक्षकांच्या मनावर होणारा परिणाम, हे संविधानक रचनेचे एक सूत्र आहे याची स्पष्ट जाणीव त्यांना होती म्हणूनच घटनांच्या क्रमाबद्दलचा विचार त्यांनी वेळोवेळी मांडला आहे. नाटक हे दृश्यकाव्य आहे. नाटकाची बांधणी घटना, व्यक्ती, प्रसंग इ. सर्व दृष्टीने मजबूत असेल तरच त्याचा अपेक्षित परिणाम साधेल म्हणून सूक्ष्म गोष्टींकडेही लक्ष पुरविले पाहिजे असे श्री. बापट दर्शवीत आहेत.

'शाकुंतल' च्या संदर्भातच नव्हे तर कोणत्याही नाटकाच्या संदर्भात पात्रसंघाचा विचार हा मूलभूत स्वरुपाचा विचार ठरतो. नाटकामध्ये आंतरकृती (Inter action) असते. ती व्यक्ती-व्यक्तीत असते. प्रसंगा-प्रसंगात असते. कधी माणूस आणि नियती यात ती असते. त्यातूनच 'नाट्य' आकाराला येत असते. या आंतरकृतीमध्ये विशिष्ट व्यक्ती, विशिष्ट प्रसंग, विशिष्ट नियती यात जराही बदल झाला तर नाटकाचा आकृतिबंध कोलमडेल, परिणाम उणावेल किंवा तो शून्यावरही जाईल. व्यक्ती-व्यक्तीत माणूस म्हणून असणारा तरतमभाव, त्यांच्या व्यक्तिमत्वातील गडद किंवा फिक्या छटा यांचा प्रतिभाशाली नाटककाराने कुशलतेने वापर करुन घेतलेला असतो. नाटकाची वीण विणत असताना तो या रंगसंगती किंवा विसंगतीतून असा आकृतिबंध निर्माण करतो की, त्यातून काही उणे करायला किंवा अधिक घालायला वावच उरत नाही. नाटककार म्हणून हे त्याचे यश असते. प्रत्येक छोटी, मोठी व्यक्ती, प्रत्येक छोटा-मोठा प्रसंग, संवाद हा नाटकात महत्वपूर्णच असतो. नाट्यशिल्पाचे सौंदर्य त्यावर अवलंबून असते. या जाणिवेतूनच पात्रसंघाचा विचार श्री. बापट यांनी मांडला आहे. अनसूया, प्रियंवदेमुळे शकुंतला अधिक सुंदर होते. शारङ्गरव, शारद्वतामुळे कण्व अधिक

वंदनीय होतात. या व्यक्तींचे परस्पर साहचर्य, परस्परांची आणि नाटकाची उंची वाढवीत असते. कोणत्याही प्रकारच्या दुय्यमतेचे सुध्दा नाटकात काही कार्य असते. 'शाकुंतल' मधील व्यक्तिरेखांचा विचार करताना श्री. बापट यांनी पात्रसंघाचा विचार मांडला. त्यामागे नाटक कसे उभे राहते यासंबंधीची खोल समज आहे. समीक्षकाला असायला हवी ती प्रगल्भता आहे. या संपूर्ण विवेचनात श्री. बापट यांचे समीक्षक म्हणून असलेले मोठेपण जागोजागी दिसते.

'शाकुंतल' वर लिहिताना त्यांनी संस्कृत नाट्यसमीक्षेतील रसव्यवस्था पूर्णपणे मान्य केलेली आहे. 'शाकुंतल' च्या संदर्भात ती उलगडून दाखविलेली आहे. खरा रस म्हणजे शुध्द रस. हा विचार ते ठासून मांडतात आणि रसोत्पत्तीत नाटककाराबरोबर नट, सीन-सीनरी, स्टेज मॅनेजर हे सगळे घटक महत्वाचे मानतात. ही गोष्ट त्यांच्या आधुनिक दृष्टीची साक्ष आहे.

मूळ महाभारतीय कथेतील शृंगार, वीर, करुण, अद्‌भुत या रसात कालिदासाने हास्य, शांत, भयानक या रसांची भर घातली असे ते सांगतात, पण वत्सल रसाचा उल्लेख करीत नाहीत. 'शाकुंतल' मधील या अव्याजमनोहर सौंदर्याकडे त्यांचे कसे दुर्लक्ष झाले ? शाकुंतल नाटकाला वत्सलरसाचा स्पर्श जागोजाग आहे. कधी तो अत्युत्कट स्वरुपात व्यक्त होतो तर कधी निसटत्या स्वरुपात असतो.

काव्येषु नाटकं रम्यं
तत्र रम्य शकुंतला ।
तत्रोऽपि चतुर्थोऽङ्क ।
तत्र श्लोक चतुष्टयम ॥

असे जे म्हटले गेले त्यात चवथ्या अंकातील उत्कट वत्सलरसाविष्काराचा फार मोठा वाटा आहे. कण्वांना शकुंतलेविषयी वाटणारे वात्सल्य, शकुंतलेला हरीणशावके आणि वृक्षवेलींविषयी वाटणारे वात्सल्य सर्वदमनाला पाहून दुष्यंताच्या मनात उचंबळून येणारे वात्सल्य आणि त्याच्या तोंडून आलेले-

आलक्ष्यदन्तमुकुलान् अनिमित्तहासै: ।

अव्यक्तवर्णरमणीयवचः प्रवृत्तीन् ।
अङ्काश्रयप्रणयिनस्तनयान्वहन्तो ।
धन्यास्तदङ्गरजसा मलिनीभवन्ति ॥

हे उद्‌गार हा सगळा शाकुंतलातील वत्सलरसाचा प्रधान आणि प्रभावी आविष्कार आहे. या खेरीज गौतमीला शकुंतलेविषयी वाटणारे वात्सल्य, मेनकेचे वात्सल्य, दुष्यंताच्या मातेने विदूषकाला पुत्र मानणे, सर्वदमनाविषयी दासीला वाटणारे वात्सल्य अशी वात्सल्याची विविध रुपेही शाकुंतलात दिसतात. शाकुंतलमधील प्रधान रस हा वत्सलरसच आहे असे प्रतिपादन डॉ. द. रा. बेंद्रे यांनी केले आहे.

'शाकुंतल' चे सौंदर्य विविध अंगांनी पारखणाऱ्या श्री. बापट यांच्या नजरेतून हा भाग का व कसा निसटला, त्याचा ओझरता उल्लेखही त्यांच्या लेखनात कसा आला नाही याचे आश्चर्य वाटते. अखेर समीक्षादृष्टीच्याही काही मर्यादा असतात हे कदाचित याचे कारण असू शकेल.

डॉ. द. रा. बेंद्रे[२२] यांनी 'शाकुंतल' ही वात्सल्यकथाच आहे असे प्रतिपादन केले आहे. डॉ. बेंद्रे यांच्या विवेचनातील महत्वाचा भाग असा आहे.

'अभिज्ञान शाकुंतलाचे' अधिष्ठानच काय पण कार्यफल, निर्वहणही वात्सल्यात आहे हा विचार डॉ. बेंद्रे यांनी १९५२ मध्ये पुणे येथील वसंत व्याख्यानमालेत मांडला. त्यानंतर लिहिलेल्या लेखात ते म्हणतात, 'शाकुंतल' ची 'वस्तु' च मुळी 'भरत' प्राप्तीने पूर्णविराम पावते. भरतरहित शकुंतलेचा स्वीकार होत नाही, धिक्कार होतो. शकुंतला मूर्तिमान निसर्गमाता आहे. उलट दुष्यंताच्याच अपत्यस्नेहवर्धनाला सात अंक लागतात. 'शाकुंतलातील' नाट्यवस्तूच्या गुंफणीतील पुष्कळ धागे वात्सल्यपोषक आहेत. अंगभूत कथा भरतप्राप्तीची, आंगिककथा कण्व-शकुंतला वात्सल्याची, काठाकाठाने वाढणारी कथा दैविक व नैसर्गिक मातृवात्सल्याची. शकुंतकन्या शकुंतला झाडा-वेलींशी, सोदरस्नेहाने निगडित होऊन, मोठ्या बहिणीने छोट्या बहिणीचे लग्न जुळविण्यात रंगून जावे त्याप्रमाणे वनज्योत्स्ना सहकारांच्या गुणमीलन कोष्टकात गर्क होते, पण तीच शकुंतला अचानक खऱ्याखुऱ्या लग्नाच्या तावडीत सापडते. अपत्यरहित दुष्यंत मृगयेत दैवयोगाने आश्रम-

हरिणांच्या पाठीस लागत, आश्रमभूमीत पाय ठेवतो व जणू काही आपल्या (प्रतिसंहरण) सामर्थ्यप्रदर्शनाने वैखानसाकडून 'पुत्रमेवगुणोपेतो चक्रवर्तिनमाप्नुहि' हा आशीर्वादरूपी वर मिळवितो. त्याचबरोबर आंतरिक जगातून बाहुस्फुरणाच्या निमित्ताने ईप्सित स्त्रीप्राप्तीची सूचना येते. या सूचनेबरोबर मधुरालाप कानी पडतात आणि शकुंतलेचे दर्शन होताच राजा आपण आश्रमात आहोत हे विसरतो व एखाद्या गंधर्वनगरात असल्याप्रमाणे वागतो.

अनपत्य दुष्यंत, चक्रवर्ती पुत्रासंबंधी वर, निसर्गमाता शकुंतला आणि बहि:सृष्टी व अंत:सृष्टी या दोन्हीही ह्या दैवनियोजित कार्याला धडाडीने अनुकूल, असा समन्वय जमल्यावर काय विचारावे ?

'शाकुंतलाच्या' दुसऱ्या अंकातील एक प्रमुख घटना म्हणजे 'पुत्रपिंडपालन' नावाच्या उपवासाच्या दिवशी दुष्यंताने नगराला परत यावे म्हणून राजमातेने करभकाकडून पाठविलेला संदेश. ज्या मातृभावप्रेरणेमुळे राजमाता 'पुत्रपिंडपालन' उपवास करते त्याच्या फलप्राप्तीचा दैवनियोजित मोका आश्रमात असा जमून आला असता, दुष्यंताने परत राजधानीस जाण्याचे ठरविले असते तरी ते कोणत्या ना कोणत्या कारणाने मोडले असते.

तिसऱ्या अंकात गौतमीच्या मातृवात्सल्याचा अति गूढ प्रकार दिसून येतो. शकुंतला आतपलंघनाने अस्वस्थ झाली आहे हे वृत्त आश्रमवासियांना कळते. कण्व तर आश्रमात नाहीत. शकुंतला कण्वाची जीव की प्राण. 'कण्वस्य कुलपते: उच्छ्वसितम् इव ।' गौतमीकडून शान्त्युदक पाठविण्याची व्यवस्था केली जाईल हा निरोप देऊन यजमान-शिष्य जातो. या अंकाच्या शेवटी गौतमी शान्त्युदक घेऊन येते.

दुष्यंत-शकुंतला विवाह-विधी हा गांधर्व प्रकार होता. प्रियंवदा, अनसूया यांनाही या घटनेत सामील होताना आपण कण्वांना अथवा आश्रमाला अमान्य होणाऱ्या प्रकारात भाग घेत आहोत असे वाटले नाही.

'चक्रवाकवधू: आमंत्रयस्व सहचरम् उपस्थिता रजनी' ।

हा नेपथ्यातून येणारा इशारा गौतमीचा आहे. गौतमी जाणून आहे की, लताकुंजात दुष्यंत-शकुंतला आहेत. 'दुष्यंताला लपविण्यापेक्षा आपल्या समक्ष शकुंतलेने आपली प्रणयसिध्दी

प्रकट करावी. नाही तर कठीण काळ येण्याचा संभव आहे.' अशीच सूचना गौतमी 'उपस्थिता रजनी' म्हणून देते. 'प्रतिकूल दैव' ते हेच । हा गौतमीचा सल्ला भाबड्या मुलींच्या लक्षात येत नाही.

तिसऱ्या आणि चौथ्या अंकाच्या मध्ये घडून गेलेल्या एका घटनेचा 'दीर्घापांग' हरिणाच्या प्रसंगाचा उल्लेख पाचव्या अंकात दुष्यंत-शकुंतला मीलनाचा पुरावा म्हणून पुढे येतो. शकुंतला सहज वात्सल्याने भरलेली मंदाकिनी आहे आणि दुष्यंत सावकाश पण निश्चितपणे आर्द्र होणारा पार्थिव प्राणी आहे. या पार्थिव बीजाला वात्सल्याचा मोड शकुंतलाप्रेमाच्या संतत धारेने येतो. पाचव्या अंकात जी उघडझाप होते व कडक उन्ह पडते तेही, सहाव्या अंकातील विप्रलंभापेक्षा, सहाव्या अंकातच नैमित्तिक रीतीने आलेल्या धनमित्राच्या प्रसंगाने उफाळून बाहेर पडणाऱ्या वात्सल्याच्या अंकुरास जास्त पोषक आहे. तो अंकुर इतका प्रबळ आहे की, त्याचा सात्विक भाव मूर्च्छेत परिणत होतो आणि योग असा की, इंद्रलोकातून मातली दुष्यंताला बोलावण्याकरिता त्या क्षणीच येतो. चौथा अंक तर कण्व वात्सल्याचा कळस आहे.

पाचव्या अंकात शकुंतलेच्या सत्वपरीक्षेची कमाल होते. आकाशातून एक ज्योती येते आणि शकुंतलेला घेऊन जाते. तरीही लोक म्हणतात की मेनका वात्सल्यहीन होती !

सहाव्या अंकात अचानक धनमित्राचे प्रकरण पुढे येते.

'नूनं प्रसूतिविकलेन मया प्रसिक्तं ।
धौताश्रुशेषमुदकं पितर: पिबंति ॥

असे म्हणून दुष्यंत मूर्च्छित होतो. देवदूत मातलीचा प्रवेश होतो. आणि सातव्या अंकात वात्सल्याचे सर्व प्रवाह एकमुखाने वाहू लागतात.

सातव्या अंकात तपस्वी शकुंत-विश्वामित्र, दुहितृवत्सला मेनका, 'पुत्रप्रीतिपिशुनचक्षू' ने पाहाणारे आदिती-मारीच, दुष्यंत-शकुंतला आणि भरत या सर्वांची भेट होते. या मंडळींना कण्वाचीही आठवण होते. दुर्वासाच्या शापामुळे दारुणरुप धारण केलेला प्रसंग विधात्यांच्या प्रसादाने वात्सल्यपर्यवसायी होतो. दुष्यंत, शकुंतलेच्या, आपल्या मुलासमोर पाया पडतो.

दुष्यंताचा हा शकुंतलेला प्रणाम प्रियाप्रणयाराधनाचा प्रकार नसून वात्सल्याची साधना आहे. वात्सल्य अंका-अंकातून पायरी-पायरीने वाढत-वाढत सातव्या अंकात परिपाक पावते. सातव्या अंकात भरताच्या प्रथमदर्शनी दुष्यंत उद्गार काढतो-

'किं नु खलु बालेऽस्मिन् औरस इव पुत्रे स्निह्यति मे मन: ।
नूनम् अनपत्यता मां वत्सलयति ॥'

याच सातव्या अंकात कुमारप्रत्यभिज्ञा, विरहोत्तर समागम व वात्सल्याची परिपूर्णता होते. शकुंतला तर मातृत्वाच्या नैसर्गिक वात्सल्याने पृथ्वीवर अवतरलेली देवमाया आहे. भरतखंडाला आपल्या नावाने पुन: शिक्कामोर्तब करणारा हा दुसरा भरत चक्रवर्ती (पहिला नाभिपुत्र ऋषभदेवाच्या पोटी येतो ती कथा भागवतात आहे.) शकुंतलेच्या पुण्यक्षेत्रात जन्म घेतो. शकुंतला हे सामान्य क्षेत्र नव्हे. मेनकेचे देवदास्य, सृष्टीचे दैवी वात्सल्य, इंद्राची दिव्य मैत्री, अदिती कश्यपांचे परम माधुर्य, कण्वाचे सात्विक कारुण्य, शकुंत-विश्वामित्राचे महातप ही सर्व शकुंतलेत सफल झाली होती. मातृक्षेत्रातून आलेला दुष्यंतही अलौकिक पुरुषच होता. शकुंतला-दुष्यंताचे श्रेय आणि अदिती-कश्यपांचे प्रेय ही भरतात साफल्य पावतात. ही दोन टोके लक्षात ठेवून 'अभिज्ञान शाकुंतला' च्या वाढीकडे पाहावे. मूळ बीजमंत्र (शकुंतलेचे) ध्यान, (परस्परार्कर्षण वाढून ते जीत स्थायी झाले आहे अशी) धारणा, (दुर्वासशापाने आणलेला) विक्षेप, (पाचव्या अंकात शकुंतला-त्यागाचे) आवरण, आत्मदर्शन, वात्सल्यसिध्दी या पायऱ्यांनी या नाटकात फलनिर्वहण होते.

दुष्यंत-शकुंतला यांचे सात्विक आकर्षण हे प्रथम शिवदर्शन आहे. कण्वांचा करुणावतार आणि दुर्वासांचा रुद्रावतार चौथ्या अंकात होतो आणि आपन्नसत्व शकुंतला आश्रमाच्या चतुरंग आशीर्वादासहित हस्तिनावतीकडे निघते ते शिवतर कल्याणस्वरुप पाहण्याकरिता. परंतु तिला सर्व सतींना द्यावी लागणारी रौद्र सत्वपरीक्षा पाचव्या अंकात द्यावी लागते. त्या परीक्षेत दुष्यंतही उत्तीर्ण होतो. हे दृश्य सहाव्या अंकात दिसते. सातव्या अंकात शिवतमरसाचा प्रीतिसंगम आपणास पहावयास मिळतो.

याशिवाय आणखी एक प्रचिती रसिकांना घेता येईल. दुष्यंताचे बळ किंवा सत्व आर्तत्राणात आहे असे पहिल्या अंकात म्हटले आहे. तेच आर्तत्राणाचे सामर्थ्य अंका-अंकातून वाढत-वाढत 'राक्षसदमनातून' 'इंद्रियदमना' तून 'सर्वदमनात' त साकार होते.

‘शाकुंतला’ त अशा रीतीने मातृत्वाचा, वात्सल्याचा जयजयकार आहे. भगवंताची सृष्टिमाया, गौतमी, शकुंतला, मेनका आणि अदिती यांच्या रूपाने वात्सल्यवर्षाव करते आणि अधोमुख व बहिर्मुख पुरुषसत्वाला अंतर्मुख व उन्मुख करुन आनंदपर्यवसनाकरिता पुन: सन्मुख होते. या सोहळ्याचा साक्षी होण्याकरिता जणू

‘यस्मिन् आत्मभव: परोऽपि पुरुष: चक्रे भवायास्पदम्’ ।

स्वयंभूच्या पलीकडील पुरुषोत्तम तेजस्वी दांपत्याच्या पोटी येऊन खऱ्या आनंदभवाचा अनुभव घेतो.

डॉ. बेंद्रे यांचे हे प्रतिपादन पूर्णपणे नवीन, स्वतंत्र स्वरुपाचे असे आहे. ते सर्व अभ्यासकांना पटले, पटावे असे नाही परंतु म्हणून त्याचेचे महत्व कमी नाही.

रसभंगाची श्री. बापट यांनी जी कारणे दिली आहेत, त्याबाबत जे विवेचन केलेले आहे ते त्यांच्या दूरदृष्टीचे आणि सूक्ष्म अभ्यासाचे द्योतक आहे.

‘विदूषका’ तील सूक्ष्म भेद, नाटकात त्याचे कार्य, त्याची उपस्थिती किंवा अनुपस्थिती या संबंधीचे विवेचन, चाकोरीबाहेर जाऊन विचार करण्याची क्षमता दर्शविणारे आहे. नाटकातील स्वगतासंबंधीची चर्चा तर प्रदीर्घ काळपर्यंत पुरलेली आहे. त्यासंबंधी मोजकी पण सूक्ष्म चर्चा त्यांनी केली आहे.

नाटकाचे दिग्दर्शन ही स्वतंत्र कला आहे. याची जाणीव श्री. बापट यांना होती म्हणूनच त्यांनी ‘नाटक बसवून देणाऱ्यांविषयी’ असमाधान व्यक्त केले आहे. ‘शाकुंतल’ चे चारच अंकी प्रयोग करणे आस्वादाच्या दृष्टीने अपुरे आणि मूळ कलाकृतीवर अन्याय करणारे त्यांना वाटले आहे. रसिक आणि मर्मज्ञ समीक्षक कलेच्या बाबतीत तडजोड स्वीकारत नाही हेच यावरुन दिसते. श्री. बापट यांनी ‘शाकुंतल’ संबंधी व्यक्त केलेले विचार त्यांच्या मूलग्राही दृष्टीची साक्ष पटवितात. त्यांच्या समीक्षातत्वांनी आणि समीक्षा पध्दतीने मराठी नाट्यविचार संपन्न केला यात शंका नाही.

नाटकांवरील टीकात्मक निबंध - श्री. कृ. कोल्हटकर.

रंगभूमी मासिकात श्री. गो. वा. बापट यांनी शाकुंतल व उत्तररामचरित या दोन संस्कृत नाटकांवर जे परीक्षणात्मक लेख लिहिले, त्याला श्री. कृ. कोल्हटकर यांनी लिहिलेली ही लहानशी प्रस्तावना आहे. श्री. बापट यांचे निबंध दर्जेदार आहेत हा अभिप्राय यात थोडक्यात दिला आहे, पण या निबंधाच्या निमित्ताने तत्कालीन साहित्यनिर्मिती, साहित्यसमीक्षा, समीक्षाप्रवृत्ती याविषयी श्री. कृ. कोल्हटकर यांनी जे विवेचन केले आहे ते महत्वाचे आहे. त्यांच्या या प्रस्तावनेत खालील मुद्दे आढळतात. त्यामधून त्यांची समीक्षाव्यवहाराची संकल्पना ध्यानात येते. त्याप्रमाणे श्री. बापट यांच्या लेखनाचे परिमाणही स्पष्ट होते-

१) आधुनिक नाटकांवर प्रसिध्द होणाऱ्या टीका दोषैक दृष्टीने लिहिलेल्या असतात, २) समकालीन ग्रंथकाराबद्दल टीकाकार अनुदार असतात हे खरे आहे, ३) लेखकाच्या जिवंतपणी अनौदार्य आणि मृत्युनंतर फाजील औदार्य दाखविणे हे मनुष्याच्या विसंगतीचे उत्तम उदाहरण आहे, ४) आजच्या काळात कालिदास, भवभूतींच्या ग्रंथासारखे ग्रंथ निर्माण होत नाहीत त्यामुळे मंडनपर व घटनात्मक टीका होत नाही. नि:सत्व ग्रंथ आणि ग्रंथकार हेही विशिष्ट प्रकारच्या समीक्षेला जबाबदार असतात, ५) राष्ट्रच्या अभ्युदयकाली श्रेष्ठ साहित्याची निर्मिती आणि हीनकाळात तिचे दुर्भिक्ष्य ही गोष्ट सृष्टिक्रमास अनुसरुन आहे. ६) काळाच्या चाळणीतून ज्या ग्रंथांचा परिणाम टिकतो तेच ग्रंथ व ग्रंथकार थोर होत, ७) जहाल टीकाकाराला नवीन ग्रंथाकडे तर मवाळ टिकाकाराला जुन्या ग्रंथांकडे धाव घ्यावी लागते, ८) प्रमुख संस्कृत नाटकांची मराठीत भाषांतरे होऊन बरीच वर्षे झाली, परंतु त्यावर त्याप्रमाणात टीका मात्र झाल्या नाहीत. ज्या झाल्या त्या उथळ स्वरुपाच्या झाल्या. कवितावधूच्या अंगाची ठेवण व प्रमाणशुध्दता दाखविणारे अजून झाले नाहीत, ९) मराठी भाषेतील ही उणीव श्री. बापट यांनी भरून काढली आहे. त्यांच्या निबंधामुळे मराठी टीकात्मक वाङ्मयाची योग्यता वाढली आहे. त्यांचे विवेचन नवीन व हृदयंगम आहे. उत्तम काव्यांशी तद्रूप होऊन सहृदयतेने त्यांचे मर्म दाखविता येण्यास टीकाकाराची योग्यताही मोठी असावी लागते, १०) श्री. बापट हे न्यायाधीश असल्यामुळे उत्तम कवींनी सहेतुक निर्मिलेल्या कृतीतील मर्मस्थाने त्यांनी मार्मिक रीतीने प्रकट केली आहेत.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारख्या मान्यवर लेखक-समीक्षकाने केलेल्या या विवेचनावरुन तत्कालीन साहित्यनिर्मिती आणि समीक्षा यांची परिस्थिती ध्यानात येते. त्याच्या कारणांची त्यांनी जी चिकित्सा केली आहे. तिचे मर्मही लक्षात घेण्याजोगे आहे. त्या परिस्थितीच नव्हे तर आजही श्री. बापट यांचा नाट्यविचार मोलाचा आहे.

श्री. कृ. कोल्हटकर यांच्या विवेचनानुसार श्री. बापट हे मवाळ टीकाकारात मोडतात. या ठिकाणी 'मवाळ' या शब्दाचा अर्थ सौम्य, अनाग्रही समतोल समीक्षा करणारा असाच घ्यावयास हवा. श्री. बापट यांची समीक्षा याच धर्तीची अभिरुचिसंपन्न अशी आहे. चिकित्सक पण रसिक वृत्तीने 'शाकुंतल' चे रसग्रहण करताना त्यांनी काटेकोर पण समतोल भूमिका घेतलेली आहे. कलाकृतीची समीक्षा करताना तिच्या प्रकृतिधर्माची ओळख करुन देणे, तिची प्रमाणशुद्धता तिच्या अंगोपांगांचा अन्योन्यसंबंध साधार दाखवून सिध्द करणे ही गोष्ट मराठी नाट्यसमीक्षेत दुर्मिळ होती. ते कार्य श्री. बापट यांनी केले आहे. जुन्या उत्कृष्ट ग्रंथांच्या उत्कृष्ट समीक्षेतून नवीन लेखकांपुढे, समीक्षकांपुढे एक आदर्श ठेवला जातो. असा आदर्श श्री. बापट यांनी निर्माण केला आणि या गांभीर्यपूर्ण रसिक चिकित्सेला रंगभूमीकारांनी मानाचे स्थान दिले ही घटना मराठी नाट्यविश्वाला अभिमानास्पद वाटावी अशी आहे. गो. ग. भागवत यांचे 'शाकुंतल' चा संदर्भ असलेले तीन लेख 'रंगभूमी' त प्रसिध्द झाले आहेत.

हे लेख संपूर्णपणे 'शाकुंतल' वरचे लेख नाहीत. इतर संस्कृत नाटकांच्या संदर्भातील चर्चाही त्यात आहे, पण 'शाकुंतल' चा यात केला गेलेला विचार नोंदविणे आवश्यक आहे.

'कालिदास काव्यनाटक वर्णन - सादृश्य' या लेखात श्री. गो. ग. भागवत यांनी कालिदासाच्या नाटकांमधील साम्यस्थळे दाखविली आहेत. 'अहिंसा परमो धर्म:।' या लेखात बौद्धमताचा संदर्भ कालिदासाच्या लेखनात कसा येतो ते सांगितले आहे, तर 'नाटकातील नायक व पापभीरुत्व' या लेखात शाकुंतलाचा नायक दुष्यंत याच्या वर्तनाची चिकित्सा केलेली आहे.

'अहिंसा परमो धर्म: ।' या लेखात श्री. गो. ग. भागवत यांनी कालिदास, बाणभट्ट, हर्ष यांच्या काळात बौध्द व जैन धर्मियांच्या अहिंसातत्वाचा किती जबरदस्त प्रभाव होता त्याची उदाहरणे दिली आहेत हे तत्व म्हणजे एखाद्या प्राण्याचा जीव वाचविणे म्हणजे पुण्य व जीव

घेणे म्हणजे पाप. कालिदासाच्या शाकुंतल, विक्रमोर्वशीय, आणि रघुवंश या तिन्ही ग्रंथातील उदाहरणे त्यांनी घेतली आहेत. 'शाकुंतल' च्या सहाव्या अंकात राजाच्या पहारेकऱ्यांनी कोळ्याला पकडल्यावर तो कैद केलेला कोळी (पुरुष) म्हणतो.

'सहजं किल याद्विनिन्दितं न खलु तत्कर्म विवर्जनीयम् ।
पशुमारणकर्मदारुणोऽनुकम्पामृदुरेव श्रोत्रिय: ॥'

याचा अर्थ असा की, लोक निंदा करतात म्हणून वाड-वडिलांपासून चालत आलेले आपले काम सोडून देता येत नाही. यज्ञ करणारा ब्राह्मण पशूचा बळी देताना निर्दय वाटला तरी त्याचे मन दयार्द्रच असते. श्री. भागवत यांच्या मते कालिदासाने एखाद्या विद्वान पंडितांच्या तोंडी शोभेल असे अवतरण अक्षरशत्रू कोळ्याच्या तोंडी घातले आहे. काव्यदृष्ट्या हा एक कालिदासाचा दोषच लेखकाने दाखविला आहे. प्रत्येक कलाकृतीत त्या-त्या काळाचे प्रतिबिंब पडत असते त्यापैकीच हा एक प्रकार आहे.